# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५८४/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ३१/१०/२०१८

## "स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे जयंती निमीत्त व शहिद पोलीस जवानांचे स्मृती प्रित्यर्थ भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे एकता दौड व सद्‌भावणा दौड संपन्न झाले"

भंडारा:– दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी स्वंतत्र भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांचे जयंती निमीत्त व शहिद पोलीस जवानांचे स्मृती प्रित्यर्थ भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे एकता – सद्‌भावना दौडचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला मा. श्री. शांन्तनु गोयल जिल्हाधिकारी, श्री. भट्टाचार्य सह दिवानी न्यायाधीश प्रमुख पाहुणे व श्रीमती विनीता साहू पोलीस अधीक्षक भंडारा, रश्मि नांदेडकर अपर पोलीस अधिक्षक भंडारा, बंडोपंत बनसोडे प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) यांचे उपस्थितीत पोलीस कवायत मैदान येथुन प्रमुख पाहुण्याचे हस्ते एकता व सद्‌भावना दौडला हिरवी झेंडी दाखवुन एकता दौड व सद्‌भावना दौडचे आयोजन करण्यात आले. सदर दौडचे संचालनाचा मार्ग त्रिमुर्ती चौक – बसस्टॅन्ड, गांधी चौक, शास्त्री चौक, शासकीय तंत्रनिकेतन, गणेश नगर लेआउट परत त्याच मार्गे पोलीस कवायत मैदान येथे संचालनाची सांगता झाली. यामध्ये १८ वर्षावरील पुरुष खुला गट हे १० किमी मध्ये प्रथम विजेता विकेश शेडे, व्दितीय विजेता लिलाराम बावणे तृतीय विजेता अंकीत भडके, १८ वर्षावरील महिला खुला गट हे ५ किमी मध्ये प्रथम विजेती प्रियंका हलमारे, व्दितीय विजेती नेहा गभणे, तृतीय विजेती ममता हलमारे, सामान्य नागरीक मध्ये प्रथम विजेता श्री. नरेन्द्र लांबकाने, व्दितीय विजेता देवराम बांन्ते, त्यान्त्रपमाणे पोलीस अधिकारी प्रथम विजेते पोउपनि. श्री. बी. डी. पंधरे, व्दितीय विजेते पोलीस हवालदार शंकर चौधरी, तृतीय विजेते पोलीस निरीक्षक मनोज सिडाम हे विजेते ठरले. त्याचप्रमाणे दिनांक १९/१०/२०१८ रोजी पोलीस शहीद दिनानिमीत्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्या स्पर्धेतील निवड विद्यार्थी जकादर कन्या विद्यालय भंडारा येथील तुषार शामरावजी कांबळे , कु. पुनम राजकुमार रार्घोते, कु. शेजल लिलाधर सिंगनजुडे, नुतन महाराष्ट्र विद्यालय येथील कु. दिक्षा सुनिल फेंडर, भावेश लक्ष्मण हलमारे, तनमय रमेश खोकले, लाल बहादुर विद्यालय भंडारा येथील प्रकाश रमेश निकुळे, तृप्ती माधोराव वंजारी भुषण रवि मस्के यांना मा. श्री. शांन्तनु गोयल जिल्हाधिकारी, श्री. भट्टाचार्य सह दिवानी न्यायाधीश सा. यांचे हस्ते सन्मान चिन्हे व प्रशस्तीपत्र देण्यात आले. त्याच प्रमाणे सदरचे सद्‌भावणा व एकता दौड मध्ये इतर सहभागी स्पर्धकांना शुभेच्छासह प्रशस्तीपत्रे देण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.